साप्ताहिक चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : २३
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-


www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner

■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants

For More Details Contact

INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.



Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.

WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111.
Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.

Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. ३ ते ९ ऑगस्ट २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | PRGI No. MAHMAR/2011/35979


भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. जंतर मंतर येथील तरुणांच्या आंदोलनानंतर अमित शहा यावर काय भाष्य करणार? याबाबत उत्सुकता होती. शहा यांनी या कार्यक्रमात काय सांगितलं? ''सामान्य माणसाने गीतेतील विचार दैनंदिन आयुष्यात कसे जगावेत याचे उत्तम मार्गदर्शन गीतारहस्य या ग्रंथात आहे. हा ग्रंथ वाचल्यानंतर तुम्ही आयुष्यात कधीही चूक करणार नाही, याची गॅरंटी मी देतो. मला गीतारहस्य हा ग्रंथ गुजरातीत वाचायला मिळाला होता...''



संपादकीय

घनश्याम पाटील
७०५७२९२०९२

# शहा खरंच काही वाचतात?



कार्यक्रमाच्या औचित्याने त्यांनी केलेली ही मांडणी योग्यच असली तरी खरेच अमित शहा यांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ वाचला होता का? हा प्रश्न मात्र नक्की पडतो. ते म्हणतात त्याप्रमाणे गीतारहस्य वाचल्यानंतर कोणीही, कसलीही 'चूक' करणार नाही; हे स्वीकारायचे तर मग अमित शहा गृहमंत्री म्हणून विद्यार्थी आंदोलन हाताळण्यात यशस्वी ठरले का? 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' असा जळजळीत प्रश्न करणारे लोकमान्य टिळक जर शहांचे आदर्श असतील तर मग आपल्या न्याय हक्कासाठी सरकारविरोधी भूमिका घेणाऱ्या प्रत्येकाला का पळता भुई थोडी केली जातेय? एखाद्याने सरकारमधील काही दोष दाखवले, सरकारवर टीका केली की त्याच्याशी ज्या सूडभावनेने उट्टे काढले जातात ते टिळकांना अपेक्षित होते का? मग लोकमान्य टिळकांच्या चरित्र आणि चारित्र्यातून अमित शहा यांच्यासारखे नेते नेमके काय शिकले? शहा यांच्यासारख्या नेत्यांच्या हस्ते अतिशय सन्मानाचा असलेल्या टिळक पुरस्काराचे वितरण ही गोष्ट योग्य की अयोग्य? या वादात आम्हाला जायचे नाही! मात्र शहा यांचे टिळकांप्रतिचे आकलन किती? हा प्रश्न मात्र उपस्थित करावा वाटतो.

लोकमान्य टिळक यांच्या गीतारहस्याचा गाभा काय? ते म्हणतात, 'कोणतेही काम हे कर्तव्य म्हणून पार पाडा. त्यात सूडाची भावना आली तर ते काम नासलेच म्हणून समजा.' अमित शहा आणि ते ज्या सरकारचा एक महत्त्वाचा भाग आहेत त्या सरकारचा आत्माच सूडाचा दिसतो. आजवरच्या किती तरी घटनांनी ते सिद्ध केले आहेच पण नुकत्याच झालेल्या विद्यार्थी आंदोलनातही ते प्रकर्षाने दिसून आले. ''विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमारासाठी गृह मंत्रालयाचा कारभार सांभाळणारे अमित शहा हेच जबाबदार आहेत. संसदेत येऊन यावर उत्तर देण्याऐवजी ते बंद खोलीत बसले आहेत मात्र जास्त दिवस तुम्ही तसे बसू शकणार नाही. युवक आणि जनता तुम्हाला बाहेर खेचून काढेल,'' अशा शब्दात शहा यांना लक्ष्य करत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी टीका केली आहे. केवळ विरोधी पक्षाच्या अध्यक्षाचे मत म्हणून तिकडे दुर्लक्ष करता येणार नाही तर जनभावनाही हीच आहे.

सर्व धर्माविषयी सहिष्णुता दाखवणारी गीता प्रत्येकाने वाचायला हवी, हे तर खरेच पण ते सांगतेय कोण? 'करून करून भागला आणि देवपूजेला लागला,' अशी अमित शहा यांची गत झालीय का? 'फळाची अपेक्षा न ठेवता निष्काम कर्मयोग अव्याहमतपणे सुरू ठेवा,' अशी शिकवण गीता देते. 'सगळं सोडून हिमालयात जा' अशी शिकवण गीता देत नाही. 'हे माझं आहे, हा अहंकार सोडा' असं गीता सांगते. 'स्वधर्म म्हणजे जातीचा धर्म नाही. तुमची क्षमता आणि समाजाची गरज यांचा संगम म्हणजे स्वधर्म' असं लोकमान्य टिळक स्पष्ट करतात. प्राणाची बाजी लावत सैनिकानं देश वाचवावा, कायम अद्ययावत राहत शिक्षकानं ज्ञानार्जन करावं, वैद्यानं रुग्णावर यथायोग्य उपचार करून त्यांना जीवदान द्यावं, माध्यमांनी शहा यांच्यासारख्या नेत्यांना न घाबरता सत्य मांडावं, आपल्यावर अन्याय होत असेल तर विद्यार्थ्यांनी सरकारकडे दाद मागावी, सरकारनं त्यांच्यावर लाठीहल्ला न करता त्यांचे प्रश्न समजून घ्यावेत हे असंच काही लोकमान्य टिळकांना अपेक्षित असणार ना...? स्वधर्म यापेक्षा वेगळा काय असू शकतो?

ज्या गीतारहस्यच्या वाचनाचा दाखला अमित शहा देतात त्या गीतारहस्यमध्ये टिळक महाराज म्हणतात, 'जीवनाचा उद्देश मोक्ष मिळवणे हाच असला तरी मोक्ष म्हणजे पळणे नाही. कर्म करत चित्तशुद्धी म्हणजे मोक्ष. काम करत राहा पण त्या कामाचे फळ देणे माझ्या हातात नाही. अपयश आले तर खचायचे नाही आणि यश मिळाले तर हुरळून जायचे नाही. फक्त बोलघेवडेपणा न करता चांगल्या माणसाने पुढे येऊन समाजाचे नेतृत्व करायला हवे,' असे सांगून टिळक गीतेचा आधार घेत एक महत्त्वाचा संदेश देतात, ''स्वातंत्र्यासाठी लढणे हाही एक धर्म आहे. अन्यायाविरूद्ध उभं राहणं हेच गीतेचं कर्म आहे.''

असं जर असेल तर मग आपल्यावरील अन्यायाविरूद्ध लढणाऱ्यांना असे मोडित का काढता? विद्यार्थ्यांवर लाठीमार, अश्रुधुराचा वापर ही शिकवण गीतेची आहे का? जो गीतारहस्य तुम्ही तरुणांना वाचायला सांगताय तो वाचून त्याची अंमलबजावणी केली तर हे सरकार जागेवर राहील काय? एकेकाळी हेच अमिश शहा गुजरात भवनच्या दोन खोल्यातील कार्यालयात बसून पक्षाचं काम बघायचे. नितीन गडकरी राष्ट्रीय अध्यक्ष असताना त्यांच्या दिल्लीतील कार्यालयात तासनतास वाट बघत बसायचे. आपले संपत चाललेले भवितव्य कसे सावरता येईल यासाठी अटोकाट प्रयत्न करायचे. त्याच शहांनी पक्षातील सर्वात मोठे पद मिळवले. ते केंद्रिय गृहमंत्री झाले. ३६० चे कलम हटवण्यात पुढाकार घेतला. पक्षात स्वतःचे स्थान मजबूत केले. हे सगळं गीतारहस्यच्या वाचनातून घडले असे त्यांचे म्हणणे असेल तर आनंदच आहे पण संपूर्ण गीतारहस्य त्यांना मान्य आहे का? त्यानुसार ते खरंच वाटचाल करतात का?

कुणीतरी म्हटलंय, 'आपला समाज कीर्तनानं सुधारत नाही आणि तमाशानं बिघडत नाही.' त्यामुळं गीतारहस्य वाचूनही क्रांतिची आग पेटणार नाही, हे शहा यांच्यासारख्या नेत्यांना ज्ञात असावं म्हणून ते असे सल्ले देतात. विद्यार्थ्यांचं सोडा पण शहा यांच्यासारख्या नेत्यांनी जरी खरंच गीतारहस्य वाचलं असतं आणि ते आचरणात आणलं असतं तर आपल्या राष्ट्राची दिशा कोणती राहिली असती? सध्याच्या काळात काही सन्माननीय अपवाद वगळता राजकारण्यांचा आणि वाचनाचा खरंच काही संबंध राहिलाय का? त्यात गीतारहस्यसारखे वैचारिक ग्रंथ वाचणे, अन्य विषयावरील संशोधनपूर्व, तत्त्वज्ञानात्मक वाचन करणे, त्यावर मनन, चिंतन करणे आणि सुयोग्य कृती करणे हे चित्र कुठे दिसते? 'वाचनसंस्कृती वाढली पाहिजे, सरकार म्हणून आम्ही त्यासाठी प्रोत्साहन देऊ,' असं एखादं ठेवणीतलं वाक्य उच्चारलं की समोरच्यालाही बरं वाटतं आणि माध्यमातूनही त्याची दखल घेतली जाते. त्यामुळेच शहा यांच्यासारख्या नेत्यांना अधूनमधून असं बोलावं लागतं. कोट्यवधी रुपये चहापाण्यासाठी उधळणारे सरकार त्यांच्या मंत्र्यांना सांगतं की 'वृत्तपत्रांचा खर्च परवडत नसल्याने कार्यालयातली वृत्तपत्रे बंद करा' आणि त्यांचे नेते अशा महत्त्वाच्या कार्यक्रमात छाती फुगवून सांगतात की, ''तरुणांनो, गीतारहस्यसारखे ग्रंथ वाचा.'' ही सगळी विसंगती आपला सांस्कृतिक आणि वैचारिक फोलपणा सिद्ध करण्यास पुरेशी ठरते.

'कमकुवत माणूस संन्यास घेतो आणि खरा वीर कर्मयोगी होतो,' असा संदेश लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी दिला. आज विविध क्षेत्रातील जे कुशल कर्मवीर आहेत ते सरकारच्या अनेक धोरणांमुळे मेटाकुटीला आलेत. अनेकांना तर आता हा देशही सुरक्षित वाटत नाही. त्याविषयी त्यांनी काही मत प्रदर्शित केले की लगेच त्यांना देशद्रोही ठरवत सांगितले जाते, 'मग पाकिस्तानला निघून जा!' आपल्या देशातील गैरसोयीबद्दल, आपल्या अडचणींबद्दल आपण बोलायचे नाही तर त्यासाठी विदेशातून माणसे रोजंदारीने आणायची का? व्यवस्थेच्या, सरकारच्याविरूद्ध काही बोलले की लगेच तो देशद्रोही ही मानसिकता बदलायला हवी.

आजची परिस्थिती पाहता अनेक तरुण गोंधळलेत. त्यांच्या मनात त्यांच्या भवितव्याची चिंता आहे. या सगळ्या परिस्थितीत आपले काय होणार? या भीतीनं ते ग्रासलेत. एकटेपणाच्या भावनेतून काय करावं हे न कळल्यानं ते हतबल झालेत. शस्त्र हाती घ्यायला लावणारे अनेक जण आजूबाजूला आहेत. 'सामने अपने ही है' असं अर्जुनाप्रमाणे त्यांनाही वाटतंय! पण 'अपने है तो सामने क्यों है?' या प्रश्नाचं उत्तर मात्र त्यांना मिळत नाही. या प्रश्नाचं उत्तर मिळालं तर अमित शहा यांच्यासारख्या नेत्यांच्या सल्ल्यांची गरज त्यांना पडणार नाही.



अनिल दातीर
सातारा, ९४२०४८७४१०

व्हिएतनाम : भाग दोन

# व्हिएतनाममध्ये झालो लखपती!

**थोड्याशा विश्रांतीनंतर नाश्ता करून आम्ही हो ची मिन्ह सिटी बघायला बाहेर पडलो. गाईड 'ग्रीन' आम्हाला मोडक्या तोडक्या इंग्रजीत माहिती देत होता. व्हिएतनाममध्ये खूप कमी लोक इंग्लिश बोलतात. त्यांची भाषा आपल्याला मुळीच कळत नाही. आपल्या प्रश्नावर त्यांनी दिलेली प्रतिक्रिया किंवा उत्तर ऐकून आपण अजूनच घोटाळ्यात पडतो. गुगल ट्रान्सलेटर हा सर्वोत्तम पर्याय. मोबाईलमधील गुगल ट्रान्सलेटरचा माईक ओपन करून आपण आपल्या भाषेत बोलायचे. ट्रान्सलेटर व्हिएतनामीम धून किंवा आपल्याला हव्या त्या भाषेतून टाईप करून देतो. ते समोरच्याला दाखवले की त्याची ट्यूब लगेच पेटते.**


व्हिएतनामी भाषेची मुळाक्षरे इंग्लिशसारखी वाटत असली तरी त्यांचा अर्थ इंग्लिशसारखाच असेल असे नाही. त्यामुळे व्हिएतनामीमध्ये लिहिलेल्या कोणत्याही शब्दाचा किंवा वाक्याचा आपण काढलेला अर्थ त्याच्या जवळपासही नसतो. ट्रान्सलेटर हाच उत्तम पर्याय. हो ची मिन्ह सिटी तशी बऱ्यापैकी टुमदार आहे. तीन-चार मजलीच इमारती. काही भागात हायराइझर बिल्डिंग आहेत पण प्रमाण कमी. रस्ते ऐसपैस, फुटपाथ वेगळा (आणि पूर्ण मोकळा) सायकलिंगसाठी वेगळे ट्रॅक. स्वातंत्र्यापूर्वी नॉर्थ आणि साऊथ व्हिएतनाम असे दोन भाग होते. नॉर्थ चायनाच्या ताब्यात आणि साऊथ फ्रेंच आणि अमेरिकेच्या ताब्यात होता. त्यावेळी हे हो ची मिन्ह मूळचे सायगाव होते आणि ती या साऊथ व्हिएतनामची राजधानी होती. १९७५ ला व्हिएतनाम स्वतंत्र झाला, एकसंध झाला आणि उत्तरेकडील हनोई हे शहर राजधानी झाले. रस्त्यात अनेक ठिकाणी पिवळ्या रंगाला पांढरी किनार असलेली घरे दिसत होती. त्या पूर्वी फ्रेंच कॉलनीज होत्या.

आम्ही शहराच्या मुख्य भागात पोहोचलो. इथे सेंट नॉत्र डॅम कॅथॉलिक चर्च आहे. त्याचे आता रेस्टोरेशन चालू आहे. त्यामुळे आत जाता आले नाही. या चर्चच्या समोरच्या बागेत एक व्हर्जिन मेरीचा उंच पुतळा आहे. २००५ साली या पुतळ्याच्या डोळ्यातून आठवडाभर अश्रू येत होते असं म्हणतात. चर्चच्या बिशपनी ऑफिशिअली याला एक मिरॅकल म्हटले होते. व्हिएतनामची सर्व जनता या काळात इथे येऊन गेली. हा गाईडने सांगितलेला इतिहास झाला पण पूर्वीच्या काळी हे चर्च आपला दरारा टिकवण्यासाठी आणि लोकांच्या मनावर येशूच्या अस्तित्त्वाबद्दल श्रद्धा टिकून राहावी म्हणून अशा चमत्काराच्या बातम्या पसरवायची. काही ठिकाणी तर मेकॅनिकल करामती करून असे चमत्कार केले जायचे, असे लिओनार्दो दा विंची या शास्त्रज्ञाने लिहून ठेवले आहे. ओघाने नाव आले म्हणून सांगतो हे लिओनार्डो दा विंची बहुतांशी जणांना मोनालिसा या चित्राचे चित्रकार म्हणून माहिती आहेत पण प्रत्यक्षात ते शास्त्रज्ञ, सिविल इंजिनीअर, मेकॅनिकल इंजिनीअर, डॉक्टर, फिलॉसॉफर, स्कल्पचर आर्टिस्ट असे बरेच काही होते. अत्यंत हुशार माणूस चुकून त्या काळी जन्माला आला, म्हणून त्यांच्या कर्तृत्वाला म्हणावा असा वाव मिळाला नाही. असो! आपल्याला काय या चमत्कारांचा उहापोह करत बसायचा नाही. या बागेसमोरच एक तीन मजली फ्रेंच वास्तुशास्त्रात केलेली पिवळ्या रंगाची इमारत आहे. हे आहे इथले पोस्ट ऑफिस. पूर्वीच्या काळी इथून फार मोठा पत्रव्यवहार चालायचा. आताही ते पोस्ट ऑफिस चालू आहे पण पर्यटक आतून फिरून येऊ शकतात. आलेले पर्यटक तिथून जगाच्या कोणत्याही ठिकाणी पत्रे पाठवू शकतात. अनेक जण अशी पत्रे लिहित होते. चेअरमन संतोषकुमार यांनीही घरच्या पत्त्यावर एक पत्र लिहून टाकले आहे. बघू ते कधी येतंय.

हे पोस्ट ऑफिस आणि व्हर्जिन मेरीचा पुतळा बघून आम्ही पुढे स्ट्रीट मार्केटमध्ये गेलो. सगळीकडे पिवळ्या फुलांची आरास केलेली होती. चमेलीसारखी फुले प्लॅस्टिक टबमध्ये वाढवून त्यांची सजावट केली जाते.



पिवळ्या झेंडुचीही फुले काही ठिकाणी दिसली. नंतरच्या सर्व प्रवासात अशा फुलांची खूप दुकाने, आरास/ सजावट सगळीकडे दिसली. त्याचे कारण म्हणजे १७ फेब्रुवारीला त्यांचे नवीन वर्ष सुरू होते. आपला जसा गुढीपाडवा तसे हे लुनार वर्ष म्हणजे चंद्राचा पहिला दिवस असे समजतात. हा वर्षातला मोठा सण असतो. सर्व ऑफिसला आठवडाभराची सुट्टी असते. लुनार हा सण चायना, व्हिएतनाम, सिंगापूर, साऊथ कोरिया आणि मलेशिया असे पाच देश साजरा करतात. या मार्केटमध्ये अनेक वस्तू विक्रीला होत्या पण कोणाकडेच स्थानिक पैसे नव्हते. मग आम्ही एका मनी एक्सचेंजमध्ये जाऊन पैसे बदलून घेतले आणि आम्ही एकदम लखपती/ करोडपती झालो. आपला एक रुपया म्हणजे २८५ व्हिएतनामी डोंग. मला २०० अमेरिकन डॉलरचे ५१,८०,०००/- डोंग मिळाले. सोप्या भाषेत सांगायचे तर आपले




३५० रुपये म्हणजे त्यांचे एक लाख डोंग. यानंतर आम्ही कु-ची टनेल या ऐतेहासिक ठिकाणाला भेट द्यायला निघालो. ते शहरापासून दोन-अडीच तासाच्या अंतरावर होते. आमची जेवणाची व्यवस्था त्याच परिसरातल्या एका इंडियन रेसोरेन्टमध्ये केली होती. जेवण करून आम्ही या कु ची टनेल परिसरात आलो. मागे उल्लेख केल्याप्रमाणे गुरिल्ला युद्ध (गनिमी कावा) जिथे लढले गेले तो हा भाग. जमिनीखाली या व्हिएतनामी क्रांतिकारकांनी अनेक बोगदे खणून ठेवले आहेत. काही ठिकाणी तर दोन-तीन मजले जमिनीखाली हे बोगदे आहेत. शिवाय या बोगद्यांना हवा येण्यासाठीही छुपे झरोके केलेले असायचे. या सर्व जमिनीखालील बोगद्यांची एकूण लांबी अडीचशे किलोमीटर आहे. अनेक ठिकाणी छुपे सापळे आहेत, छुपे शस्त्र निर्मितीचे कारखाने आहेत. एके ठिकाणी झाडाच्या पालापाचोळ्याखाली लपलेला फक्त एक फूट बाय एक फूट असा चौकोन आहे. ते लाकडी झाकण उचलून डोक्यावर धरून आत अंधाऱ्या बोगद्यात उतरायचे हा एक तसा थरारक अनुभव होता. माझ्यासह अनेक जणांनी हा प्रयोग अनुभवला. झाकण ठेवल्यावर तो चौकोन इतका बेमालूम गायब होतो की ज्याला माहिती आहे तोच शोधू शकतो. व्हिएतनामी लोक काटक आणि चपळ होते. ते हल्ला करून या बोगद्यांमधून आरामात पसार व्हायचे. अमेरिकी सैनिकांना ते सापडायचे नाहीत आणि असा एखादा खड्डा सापडला तरी जाडीमुळे त्यांना आत उतरता येत नसे. पंचवीस वर्ष चाललेल्या अमेरिकन-व्हिएतनाम युद्धात हजारो लाखो बॉम्ब वापरले गेले. इथेच असलेल्या वॉर मेमोरियलमध्ये त्याकाळचे रिकामे बॉम्ब, शस्त्रे आणि इतर युद्धसाहित्य जतन करून ठेवले आहे. इथे एक चालू स्थितीतील शूटिंग रेंज होती. जिथे पैसे भरून रायफलीतून खऱ्या गोळ्या मारण्याचा अनुभव घेता येत होता. काहींनी तोही घेतला.


जंगलात अनेक छुपे रस्ते होते, चालून चालून सर्वच थकले होते. संध्याकाळ होत होती. आम्ही सर्वांनी काढता पाय घेत बस गाठली आणि शहरात आलो. जरा फ्रेश होऊन जेवणासाठी बाहेर पडलो. आपले भारतीय रेस्टॉरंट जगभरात प्रत्येक शहरात आहेत. फक्त ते शोधावे लागतात. जेवण करून आम्ही सर्वांनी तिथल्या फॅशन स्ट्रीटवरून एक चक्कर मारली. लुनार फेस्टिवल असल्याने सगळीकडे धुमधाम होती. लायटिंग होते, लाऊड म्युझिक होते, आकर्षक दुकाने, रेस्टॉरंट्स होती, बिअर बार होते आणि तुंबळ गर्दीही होती. काही स्थानिक लोक त्यांच्या पारंपरिक पोशाखात फिरत होते. हॅपनिंग प्लेस होती. तास-दीड तिथे वेळ घालवून आम्ही परत हॉटेलवर आलो. उद्या दुसऱ्या शहरात जायचे होते. सकाळी लवकर उठून, बॅगा पॅक करून, नाश्ता करून १०.३० पर्यंत एअरपोर्ट गाठायचे होते. मग आता इथेच थांबतो, पुढच्या भागात भेटूच एअरपोर्टवर!

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# अद्‌भुत प्रवास!



डॉ. बी. व्ही. कुलकर्णी
बावधन
९४२२०१०६८२



कारणं काहीही असोत, प्रत्येकाला प्रवास हा करावाच लागतो! मी तर प्रवासाबाबतीत नादखुळा. काल माझ्या गावी म्हणजे ईश्वरपूरला थोड्या कामासाठी जाऊन रात्रीपर्यंत परत आलो.

''आम्ही कारशिवाय कुठं जात नाही'',

''आम्ही दोनचाकी कधीच वापरत नाही'',

असं म्हणणारी माझी मित्रमंडळी आहेत! पण मी एक साधा माणूस. बऱ्याच देशात पर्यटन करून आलो पण कुठेही जाताना पब्लिक ट्रान्सपोर्टने जायला मला आवडतं. आपल्याशिवाय समाजातील इतर लोकं कसं जगतात, वागतात वगैरे बघायला मिळतं, खूप काही शिकायला मिळतं.

तर मंडळी सध्याच्या सुंदर अन्‌ तुफान पावसाळी मोसमात घरातून बाहेर पडण्यासारखा आनंद नाही. मेट्रोने सकाळी पावणे आठला स्वारगेटला पोहोचलो. सांगली किंवा मिरज बस त्यावेळी फलाटावर नव्हती. म्हटलं कोल्हापूर बसने पेठ नाक्याला उतरून ईश्वरपूरला जाता येईल. तिकीट काउंटरवर गेलो आणि आजच्या माझ्या अद्भुत प्रवासाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली.

मी पेठ नाक्याचं तिकीट मागितलं. आधार कार्ड दाखवलं. आपोआप वाढलेल्या वयामुळे मिळणाऱ्या ५०% सवलतीचा लाभ का घेऊ नये ना? काउंटरवरील व्यक्ती म्हणाली, ''२६५ रुपये द्या'', मी म्हटलं, ''ऑनलाईन देतो''. 'चालेल' म्हटल्यावर त्यांनी बारकोड दिला. मी रक्कम टाकून पैसे ट्रान्सफर केल्याक्षणी त्यांनी तिकिट (पावती) माझ्या हातात दिली आणि म्हणाले, ''तुमचं तिकीट कॅशने जनरेट झालंय, तुम्हाला कॅशच द्यावी लागेल.''

म्हटलं, ''असं कसं होईल? माझे पैसे तुम्हाला ट्रान्सफर झालेत'', बँकेचा मला आलेला मेसेज त्यांना दाखवला. त्यावर त्वरित उत्तर आलं की, ''तुम्ही पेठ नाक्याला पोहोचेपर्यंत ते पैसे तुमच्या खात्यात परत जमा होतील.''

म्हटलं ''नाही झाले तर काय?''

तर म्हणाले, ''नक्की होणार म्हणजे होणार!''

मी तिकीट काढून हा लेख लिहिपर्यंत २६ तास उलटून गेले, अजूनही माझ्या खात्यावर पैसे रिफंड झालेले नाहीत. मुळात सगळं डिजिटल झालंय, नको तिथं बोटं लावल्याशिवाय कॅश बिल निघेलच कसं? हुज्जत घालत बसण्याचा माझा स्वभाव नाही. पाचशे रुपयाची नोट दिली. राहिलेले पैसे त्यांनी मला दिले. त्यात तीस रुपये कमी होते. म्हटलं ''काय झालं?'', ''सुट्टे नाहीत आत्ता! पण ड्रायवरसोबत पाठवून देतो, तुम्ही गाडीत बसा.''

(त्यांनी पाठवले ३० रु. सोनावणे म्हणून होते ते बहुतेक) तिकिटावर सीट नंबर नव्हता. म्हणाले ४ आणि ५ सोडून कुठेही बसा. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या भल्या मोठ्या 'शिवनेरीत' येऊन बसलो. आधीपासून आत गेलेले प्रवासी बसलेले होतेच. एका रिकाम्या सीटशेजारी बसलेल्या प्रवाशाला विचारलं, ''शेजारी कुणी बसलंय का हो?,'' ते म्हणाले, ''सीट ओली आहे.'' आणखी मागे गेलो. पुन्हा एकाला विचारलं. ''या सीटवर वरून पाणी पडतंय,'' असं उत्तर मिळालं. मी चक्रावलो हो! आणखी मागे गेलो. दोन्ही सीट रिकाम्या होत्या. छान मूडमध्ये बसलो आणि मंडळी रिलॅक्स होण्यासाठी माझ्याच सीटवर सहज मागे टेकलो. जत्रेमधे पाळण्यात बसल्याची आठवण व्हावी इतक्या जलद गतीने ती सीट माझ्यासकट मागच्या बाजूला पूर्ण खाली झुकली. मागे बसलेला प्रवासी माझ्यावर ओरडला, कारण माझं डोकं त्याच्या मांडीवर स्थिरावलं होतं, ''अहो काय करताय?,'' म्हटलं, ''अहो मी कुठं काय केलं? माझ्या सीटवर मी टेकून बसणं हा गुन्हा आहे का?''

माझ्यासारख्या केस पांढरे झालेल्या माणसाचे डोके त्याने का बरे त्याच्या मांडीवर सांभाळावे? मी तत्परतेने पुन्हा सरळ बसलो. दरम्यान ८ वाजले आणि बस सुरू झाली. थोडा वेळ मी माझ्या पुढच्या सीटला पाठीमागून हाताने घट्ट धरून बसलो पण ते काही सुसह्य नव्हतं. शेवटून तीन नंबरच्या सीटवर एक जागा रिकामी बघून मी तिथं जाऊन बसलो. बाहेर छान पावसाळी मोसम, म्हटलं आता हा माहोल मस्त एन्जॉय करूया! अशा वेळी मी मोबाईल अजिबात उघडत नाही. (काही जणांना हे खरं वाटणार नाही पण जाऊ द्या ना).

१०/१५ मिनिटात वरुणराजा प्रसन्न झाला आणि प्रेमाने जोरात बरसायला लागला आणि काय सांगू मंडळी, मी बसमध्ये आहे की बाहेर पावसात अशी




शंका यावी इतकं पाणी बसच्या वरच्या भागातून माझ्या अंगावर यायला लागलं. मला पाऊस खूप आवडतो की पावसाला मी जास्त आवडतो, नक्की कोण कुणाच्या प्रेमात आहे हे मला समजेनासे झाले हो. छान वातानुकूलीत शिवनेरी बसमध्ये वरुन गार हवा येत असताना, बाहेरच्या पावसाची कृपा आत बसलेल्या माझ्यासारख्या पामरावर व्हावी? मी गेल्या जन्मी नक्कीच काही तरी पुण्य केलं असावं. सगळी बस भरलेली होती. जिथं जिथं रिकाम्या सीट होत्या त्या सगळ्या सीटवर वरुन पाऊस कोसळत होता. ड्रायव्हर बिचारा त्याचं काम बिनबोभाटपणे करत होता. त्याला सांगून काय निष्पन्न होणार? आणि त्यात पांढरे केस असलेले लोकं खूपच शंका काढून इतर लोकांना उगीच त्रास देत राहतात असा समज समाजात कुणी निर्माण करून ठेवलाय कुणास ठाऊक? तर असो....

मला कितीही पाऊस आवडत असला तरी, मी तसंच बसलो तर ईश्वरपूर येईपर्यंत, वातानुकूलीत बसमध्ये माझी अंघोळ झाली असती. किती वेगळा अनुभव ना?साडेचार ते पाच तास प्रवास कसा सुसह्य व्हावा याचा विचार करत होतो. आणि लक्षात आलं की सुपीक डोक्यातून स्त्रवलेला एक उपाय आपल्याकडे आहे. मी माझी सॅक उघडली आणि त्यातून छत्री बाहेर काढली. केस पांढरे झाले तरी बुद्धी शाबूत असते हो...

वातानुकूलीत बसमध्ये मी छत्री उघडून बसलो आणि बाहेरच्या सोबत आतील पावसाचा आनंद घेऊ लागलो. तो माझा आनंद क्षणात मावळला हो! मागील सीटवर बसलेले बाबा मला म्हणाले, ''ओ ओ काय करताय?'', म्हटलं, ''मी काय केलं आता? मला बसमध्ये अंगावर पाऊस नको असेल तर मी छत्री उघडू शकत नाही का?''

तर ते बिचारे म्हणाले, ''तुमच्या छत्रीच्या काडीसोबत सगळं पाणी माझ्या अंगावर येतंय.''

मला जाणीव झाली की पावसावर कितीही प्रेम असलं किंवा तो माझ्या प्रेमात असला तरी इतरांच्या अंगावर, छत्रीवरून पडणाऱ्या पागोळ्या जाता कामा नयेत. मग चारी बाजूनी सैनिक जसं खूप बारीक लक्ष ठेवतात तसं ठेवून मी छत्रीचा अँगल सगळ्या बाजूनी बघून माझ्या उजव्या, डाव्या बाजूला, पुढे / मागे बसलेल्या कुणावरही आतील पावसाची कृपा होऊ नये याची खबरदारी घेतली. स्वारगेट ते कराड असा प्रवास



म.रा.मा.प.म
रा.प. स्वारगेट पूणे आगार
क्र: ००१८८९६ ३१/०७/२६ ०७:५०:३९
जन शिवनेरी बस M6451
स्वारगेट पुणे ते पेठ नाका
(प्रवासाचे एकूण टप्पे = 31.0) 88618
ज्येष्ठ नागरिक फूल: १x२६५.०० = ₹ २६५.००
अ.स.निधी सहित
रोख = ₹ २६५.००
SWR7037 ०८६२२२ L S SONAWANE
MH06S9431

अहस्तांतरणीय ८६२२९३०५३२२२८५५

वातानुकूलीत बसमधून छत्री घेऊन करण्याचा योग नशिबाने माझ्या वाट्याला आला. नंतर एक प्रवासी उतरल्यामुळे मला छत्रीशिवाय पेठ नाक्यापर्यंत फक्त बाहेरील पावसाचा आनंद घेता आला. श्रावणधारा माझ्यावर एवढ्या प्रसन्न होतील असं स्वप्नात पण कधी वाटलं नव्हतं. पुढं बसलेले प्रवासी जेव्हा अधून मधून सहज मागे बघायचे तेव्हा बसमधील छत्रीधारीतील मला बघून छान हसायचे, माझे केवढे फोटो घेतले सर्वांनी? मला अगदी लाजल्यासारखं झालं हो. माझ्या मागे बसलेल्या माय लेकीपैकी कुणी तरी माझा हौसेनी व्हिडीओ पण काढला. मी बऱ्याच देशात भ्रमंती केली आहे पण तुम्हाला सांगतो, आपल्याकडील लोकांची सहनशीलता इतरत्र कुठेही बघायला मिळाली नाही. सध्या बऱ्याच लोकांना घरातही सहनशक्ती वाढवावी लागते. तसंच बाहेरही वाढवावी लागणं ही काळाची गरज असू शकत नाही का? बघा बरं, आपल्या जनतेची केवढी काळजी घेत असते. सामान्य जनतेला अशा अद्भुत प्रवासाचा न विसरता येण्याजोगा अनुभव, परिवहन महामंडळ, त्यातील अधिकारी, परिवहन मंत्री, नक्की कोण घेत असतील या भानगडीत जनतेने कधीच पडू नये. नेहमी सकारात्मक विचार करून, येईल त्या प्रसंगातून आपला आपण आनंद घेत राहावा हेच उत्तम ना? बऱ्याच 'का?'ची उत्तरं समान्य माणसाने विचारायची नसतात; कारण, 'भारत माझा देश आहे आणि माझ्या देशावर माझं प्रेम आहे' हे कधीही विसरायचं नसतं बरं का!

अशीच कुणाला वेगळी सफर करावयाची असेल तर जरूर शिवनेरीने प्रवास करायला विसरू नका बरं का! ■■





जनार्दन देवरे
मनमाड
९०११६९४८८५



मसाला पान

# नव्याण्णव नांदी, नंतर शंभरावा आनंदी...!



*(या लघुनाट्यांशातील सर्व पात्रे व घटना काल्पनिक असून ती कुणाच्या व्यक्तिमत्त्वाशी वा घटनांशी जुळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. – लेखक )*

...............................................

(दरबार भरला आहे. सर्व दरबारी उपस्थित आहेत. फाकडोजी महाराज आज प्रसन्न दिसताहेत. सेवकाकडे पाहत विचारतात.)

**महाराज :** सेवका, अरे आलेत का ते साहित्यिकवृन्द? किती प्रतीक्षा करायची? त्यांच्याशी विचारविमर्श करण्यासाठी थांबलोत आम्ही दोन तासांपासून. सायंकाळ होत आली आता! तिकडे राणीसरकार वाट पाहताहेत आमची. आज त्यांचं गुरुपौर्णिमेचं व्रत आहे रे...!

**सेवक :** महाराज! जय हो! विजय हो! निघालेत ते. सारे मिळून एकाच गाडीने येताहेत अन् साहित्यिक मंडळी सायंकाळीच चार्ज होते हो! पाच सेकंदांपूर्वीच फोन झाला माझा कार्याध्यक्षांशी. तसा मघाशीच प्रधानजीनीही फोन केला होता कोषाध्यक्षांना पण अंमल जरा उशीरच होतोय...!

**महाराज :** काय प्रधानजी? काय म्हणाले कोषाध्यक्ष?

प्रधानजी (चाचपडतच) – येतोच म्हणाले महाराज! जुन्या कार्यकारिणीचं दप्तर तपासून माहिती काढून येतो म्हणाले.

**महाराज :** काय अर्थ आहे याला? जरा वेळ मिळाला निवांत तर हे असं वाट पाहणं नशिबी आलं! तिकडे राणीसरकार आमच्याविण...!

**एक मंत्री :** होय की महाराज! गेली पंचवीसेक दिवस त्या झुरळांनी पार उच्छाद मांडला होता. नाही. एकदाचं कसं तरी दिल्लीश्वरांनी ते प्रकरण मिटवलं! पण त्रास मात्र आपल्यालाही झालाच. सारं स्वास्थ्य हरवलं. त्यात इन्स्टावरची टीकाटिप्पणी तर कळसच!

**महाराज :** तो विषय नका काढू आता! दुसरा विषय घ्या काहीतरी!'(साहित्यिकवृन्द हातात काही कागदपत्रांच्या फाईल घेऊन प्रवेशतात.)

**साहित्यिक वृन्द :** (एका सुरात) महाराज, जय हो! विजय हो!

**महाराज :** या! स्वागत आहे दरबारात! पण फार उशीर केलाय हो लेखक महोदय!

**कार्याध्यक्ष :** क्षमा असावी महाराज! पण या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या भव्यदिव्य आयोजनाचे आमचे स्वप्न असल्याने सध्या आम्ही सारे त्यात मसरूफ़ आहोत. शिवाय आम्ही आता साहित्य पत्रिकेचा अंकही देतोय छापील स्वरूपात. सहा वर्षांपासून बंद होता तो. परिषदेच्या इमारतीचं नुतनीकरणही करायचंय. खूप कामं आहेत. हिशेबाचा ताळमेळ बसवायचाय. रात्रीचा दिवस करूनही वेळ कमीच पडतोय बघा. इकडे यायला निघालो तेवढ्यात दादांचं बोलावणं आलं आणि अचानक तासभर का होईना पण कोथरूडला जावंच लागलं! (मोठा श्वास घेत थांबतात.)

**प्रधानजी :** दादा म्हणजे आपले चंद्रकांतदादाच ना?

**महाराज (ठाकरे शैलीत) :** आता पुण्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन तेही शंभरावे आहे म्हटल्यावर दादांचा मार्गदर्शनवजा सहयोग असणारच. नव्हे तो असायलाच हवा. का नको? ते त्यांचं कर्तव्यच आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागासारखं महत्त्वाचं खातं आहे त्यांच्याकडे. शिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे भव्य प्रांगण, तो परिसर व्वा! मग काय पुण्यातल्या उच्च तंत्रशिक्षण संस्थाचे पदाधिकारी, अभाविपचे विद्यार्थी, स्वयंसेवक वगैरे भरपूर असतील दिमतीला. काय उणे मग हिंमतीला. शिवाय पुणे महानगरपालिकेचं मनुष्यबळही आहेच. छान!

**प्रधानजी :** शिवाय ते पुणे बुक फेस्टिवलचे संस्थापक राजेश पांडेही आहेत म्हणे! मग काही टेन्शन नाही! त्यांनी सुरू केलेला शांतता, पुणेकर वाचत आहेत! सारखा उपक्रमही ठेवा की नांदी संमेलनातून गावोगावी. भन्नाट कल्पना आहे हो ती.

**कोषाध्यक्ष :** नक्कीच! यावेळी जरा आगळंवेगळं नियोजन करायचं ठरवलंय. महाराष्ट्र व्यापून टाकणार आहोत आम्ही यावेळी. सर्व महाराष्ट्रात मराठी साहित्य संमेलनमय वातावरण असेल सहायेक महिने तरी.

**महाराज :** ते कसं बुवा?

**सचिव :** मुख्य संमेलनाआधी नव्याण्णव ठिकाणी नांदी संमेलने घेणार आहोत आम्ही यावेळी. मग शंभरावं अखिल भारतीय संमेलन पुण्यात. २८ ते ३१ जानेवारी दरम्यान.

**प्रधानजी :** अरे व्वा! म्हणजे नव्याण्णव नांदीनंतर शंभरावं आनंदी!

(सर्व दरबारी मंडळी हसते, सेवक मध्येच उत्सुकतेने विचारतो.)

**सेवक :** बरं ही नांदी संमेलने कुठे कुठे होतील? आमच्या गावाकडं एखादं ठेवा की कवीराज!

**कोषाध्यक्ष :** शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ऐतिहासिक व भव्यदिव्य व्हावे, या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्यासह बृहन्महाराष्ट्राच्या एकूण ९९ ठिकाणी एकदिवसीय नांदी संमेलने घेतली जाणार आहेत. ही संमेलने एका विशिष्ट संकल्पनेवर असून, त्यासाठी ६५ विविध विषयांची निवड मागील आठवड्यातच पुणे येथे झालेल्या सविस्तर बैठकीत निश्चित करण्यात आली आहे.

**सेवक :** अहो पण गावं कोणकोणती म्हणायची?

**महाराज :** सेवका, एवढा उतावीळपणा बरे नव्हे. सांगताहेत ना ते! एखादं आपल्याकडेही असेलच नक्की! त्यात ठेवू तुझे काव्यवाचन.

> **वेलची**
>
> **बाह्यांगीच छान । शब्दांचे सोहळे ।**
> **आतून डोहाळे । खुर्चीचेच ।।**

**प्रधानजी (हसतच) :** दरबारी सेवक असला तरी शेवटी कवीच तो महाराज, त्यामुळे जरा उतावळेपणा असणारच..!

**महाराज :** बरं पुढे सांगा.

**कोषाध्यक्ष :** होय महाराज, इकडेही असेल एक नांदी नक्की. शिवाय उदाहरण म्हणून सांगायचं तर आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे नांदी संमेलन संत साहित्यावर तर निफाडचे कृषी साहित्यावर आणि मालेगावचे गझल साहित्यावार घेतले जाणार आहे. अशीच नांदी संमेलने विविध जिल्ह्यात घेतली जातील.

**महाराज :** अरे व्वा! छानच! पण ही शहरे कुणी निश्चित केली?

**कार्याध्यक्ष :** राज्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जिल्हा प्रतिनिधींच्या बैठकीत १४० प्रतिनिधींनी उपस्थिती नोंदवली होती, त्या वेळी ९९ नांदी संमेलनांची रूपरेषा ठरविण्यात आली.

**महाराज :** या नांदींची काही खास वैशिष्ट्ये असणार आहेत म्हणे, काल  वाचलं कुठेतरी आम्ही.

**सचिव :** होय महाराज! नांदी शंभराव्या साहित्य संमेलनाची या उपक्रमातून मुंबई, पुणे वगळता जिथे साहित्य संमेलने झाली आहेत अशा महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह विविध भागात संमेलनपूर्व ९९ साहित्यिक उपक्रमांमधून आगामी साहित्य संमेलनाची नांदी होणार आहे.

**कोषाध्यक्ष :** १५ ऑगस्ट २०१६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत हे साहित्यिक उपक्रम होतील.

**महाराज** (प्रसन्न होत) **:** मस्त! आणखी काही?

**कार्याध्यक्ष :** नांदी संमेलनांमध्ये दुर्ग साहित्य संमेलन, वैद्यकीय, विनोदी, डिजिटल, रजनी, कोकणी, अहिराणी, व्यायामाभ्यास, ग्रंथपाल, नाट्य, विठ्ठल यासारखी ६५ विविध विषयांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय कवीकट्टा, कथाकथन इ. आहेच.

**प्रधानजी :** याचं नियोजन वगैरे?

**सचिव :** आगामी काळात जिल्हा प्रतिनिधींनी नियोजित केलेल्या विषयानुसार संमेलनाची रूपरेषा लवकरच ठरेल.

**सेवक :** एखादी नांदी झुरळांसाठी वगैरे?

**महाराज :** काहीतरीच काय सेवका? नको तो विषय आता! पण मग यासाठी खर्च वगैरेची तरतूद कवीराज...!

**कोषाध्यक्ष :** जगात कोणत्याही भाषेत १०० वर्षे साहित्य संमेलने झालेली नाहीत. हे एक जागतिक अद्भूत असे धाडस आहे. म्हणूनच शासन या संमेलनासाठी साहित्य महामंडळास पाच कोटी रुपये निधी देणार आहे. तसं मराठी भाषा मंत्री श्री. उदय सामंत यांनी जाहीर केलंय. यापूर्वी दोन कोटी रुपयेच दिले जायचे हं! या घसघशीत तीन कोटींच्या वाढीसह नव्याण्णव नांदी संमेलनासाठी पाच कोटी रुपये वेगळे.

**कार्याध्यक्ष** (फाईलमधील कागद काढीत) **:** शिवाय विद्यार्थी साहित्य संमेलनासाठी चार कोटी. परदेशात होणाऱ्या संमेलनांसाठी सीएसआर माध्यमातून दोन कोटी, पुस्तक दालनांसाठी ५० लाख आणि मसापला खर्चासाठी एक कोटी.

**कोषाध्यक्ष –** असे जवळपास साडेसतरा कोटींचा निधी शासन देतंय यंदा.

**एक मंत्री** (तोंडात बोट घालीत) **:** बाप्पो...! पण अभिजात मराठीच्या उत्सवासाठी एवढा निधी हवाच. का असू नये? असायलाच हवा!

**महाराज :** यातून गावोगावी वाचनसंस्कृती वाढावी म्हणूनही काही करा. कोषाध्यक्ष ऊर्फ कवीराज फार मोठी जबाबदारी आहे तुमच्यावर आणि साहित्यिक मंडळी व्यवहाराच्या दृष्टीने अंमळ शांतच तेव्हा सगळे हिशोब नीट ठेवा हो!

**कोषाध्यक्ष** (चिंता दाखवित) **:** ते महामंडळ बघेल. आम्ही बापुडे आयोजनापुरते. तरी शक्य तो हातभार असेलच आमचा, शिवाय गेल्या काही वर्षात मसापची गंगाजळी पार आटलीय. ती वाढवण्याची मोठी जबाबदारी आहे आमची. मागचे हिशेब अजून लागेनात! पण होईल, सारं होईल बघा.

**महाराज :** आणखी काही माहिती द्या ना! आकडे ऐकून आमची उत्सुकता वाढलीय आता.

**सचिव :** (उत्साहाने) पूर्वीचे मराठी ग्रंथकार संमेलन म्हणजे आताचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. तर पुणे येथे १८७८ मध्ये झालेल्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष महादेव गोविंद रानडे होते. शिवाय, रानडे यांचे जन्मगाव निफाड. पूर्वी संमेलनाची ओळख ही मराठी ग्रंथकार संमेलनअशी होती. त्यामुळे पुणे येथे पहिले नांदी संमेलन १८ ऑगस्टला होईल तर ९९ व्या नांदी संमेलनाचा समारोप १५ जानेवारी २०२७ ला निफाड तालुक्यात ओझर येथे होणार आहे.

**प्रधानजी :** असा आहे तर हा नांदी प्रवास. पुणे ते निफाड आणि परत पुणे! छान!


**महाराज :** खूपच कल्पकतेने नियोजन करताहात आपण. आनंद वाटला.

वाचन, पुस्तक प्रदर्शन वगैरेबाबत नवं काही?

**कोषाध्यक्ष :** एनबीटी म्हणजे आपल्या नॅशनल बुक ट्रस्टतर्फे पुस्तकांच्या दोन व्हॅन म्हणजे फिरते वाचनालय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यात पंधराशे पुस्तकांचा समावेश असून, या व्हॅन ९९ ठिकाणी होणाऱ्या नांदी संमेलनाच्या

पान ५ वर ▶▶

# राग, चीड, मैत्री आणि विश्वास



भगवान दातार
पुणे
९०१११३६९००

मी ७० च्या दशकात महाविद्यालयात असताना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संपर्कात आलो. त्या काळचं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक विद्यार्थी हा कुठल्या ना कुठल्या विद्यार्थी संघटनेशी जोडलेला होता. त्यावेळचे विद्यार्थी नेते त्यावेळच्या राजकारणातील नेत्यांपेक्षा जास्त प्रभावी होते. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, बाळासाहेब आपटे, भालचंद्र कांगो, सुभाष लोमटे, वसंत काळे, अनिरुद्ध देशपांडे, डॉ. विजय गव्हाणे, अमर हबीब, शांताराम पंदेरे, मंगल खिंवसरा, प्रकाश जावडेकर, धरमचंद चोरडिया, माधव ठाकूर असे एकापेक्षा एक ताकतीचे विद्यार्थी नेते त्यावेळी राज्य गाजवत होते. एसेम, ना.ग. गोरे, प्रा. ग. प्र. प्रधान, बाळासाहेब आपटे, रामभाऊ म्हाळगी, मृणाल गोरे, बापूसाहेब काळदाते हे यांचे राजकीय गुरु होते तर गोविंद तळवलकर, अनंत भालेराव, बाबा दळवी, ग. वा. बेहेरे, यशवंतराव केळकर यांच्या वैचारिक मार्गदर्शनातून ही पिढी घडली होती.

त्या काळातलं सदैव चर्चेत असलेलं नाव होतं कुमार सप्तर्षी. पुण्यातला हा तरुण नेता त्यावेळी महाराष्ट्र गाजवत होता. समाजवादी विचारांची युक्रांद ही महाराष्ट्रातली एक प्रमुख विद्यार्थी चळवळ होती आणि तिचं नेतृत्व कुणाहीकडे असलं तरी त्यातलं अग्रभागीचं नाव होतं कुमार सप्तर्षी.

मनातली तळमळ बोलण्यात उतरविणारं आक्रमक वक्तृत्व, सदैव चळवळीत राहण्याची मनाची धारणा, कोणतेही कष्ट सहन करण्याची क्षमता आणि चर्चेत राहण्याची हातोटी ही अंगभूत वैशिष्ट्ये असणाऱ्या डॉक्टरांनी अभ्यास आणि तर्कशुद्ध चिंतन यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच झळाळी आणली.

खरं सांगायचं म्हणजे माझ्यासारख्या संघ परिवारातल्या विद्यार्थ्याला त्यांची आक्रमकता त्यावेळी आवडत असे आणि बोचतही असे. विचारसरणीशी प्रामाणिक असलेल्या प्रत्येकाचं असंच होत असावं. डॉ. बापूसाहेब काळदातेंची भाषणं ऐकताना आम्ही एकीकडे मंत्रमुग्ध होत असू तर दुसरीकडे त्यांच्या विधानांनी मानत चीड निर्माण होत असे.

हिंदू, हिंदुत्व, संघ परिवार यांना कुमारांचा असलेला विरोध अनेकदा अनाठायी वाटत असे. हा माणूस थोडा सौम्य विचार करुच शकत नाही का? असे वाटून मनात चीड निर्माण होत असे. आचार विचारात थोडी मृदुता आणली तर किती तरी प्रश्न सामंजस्याने सुटतील असे वाटायचे. कदाचित डॉक्टर त्याकाळी महाराष्ट्रातल्या संघ परिवाराचे शत्रू नंबर एक असतील.


मी पुण्यात आलो आणि डॉक्टरांशी संपर्क वाढला. पत्रकारितेमुळे भेटीही होत असत. त्यावेळी या माणसाच्या वरवरच्या आक्रमकतेमागे जिव्हाळाही दडलेला आहे असं जाणवायला लागलं. एकदा भेटलो तेव्हा सहज बोलताना डॉक्टर म्हणाले, ''संघ म्हणजे त्याच त्या लोकांना त्याच त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा सांगणारे लोक.'' (ते हे वाक्य त्यांच्या भाषणातही अनेकवेळा वापरायचे.)

या वाक्यानंतर ते थोडे थांबले. तेवढ्यात मी त्यांना म्हणालो, ''एखादी चांगली गोष्ट मनावर बिंबवायची असेल तर ती पुन्हा पुन्हा सांगावीच लागते. यातूनच तर श्रुती-स्मृती निर्माण झाल्या. तुम्ही समाजवादी लोक चांगल्या गोष्टी सांगता पण त्याचा पाठपुरावा करत नाहीत.''

''उदाहरण दे! उगीच काही बोलू नकोस,'' ते म्हणाले.

मी म्हटलं, ''बलसागर भारत होवो असं साने गुरुजी सांगून गेले. किती समाजवाद्यांनी त्याचा पाठपुरावा केला? संघाने मात्र हे गीत स्वीकारलं आणि वर्षानुवर्षे मेहनत करुन या ध्येयासाठी झोकून देणारे हजारो स्वयंसेवक घडवले. 'बलसागर भारत होवो' असं म्हणणारे सगळे एक झाले तर किती चांगलं होईल!''

क्षणभर डॉक्टरांनी पॉझ घेतला. ते काहीच बोलले नाहीत पण त्यानंतर आमच्या ओळखीचं रुपांतर मैत्रीत झालं. लोकसत्ताने नगर आवृत्ती सुरु केली तेव्हा त्या टीममध्ये मी होतो. 'नगरच्या मातीचं आणि महानगराच्या धर्तीचं' असं त्या आवृत्तीचं घोषवाक्य होतं. यात नगरचं खरंखुरं प्रतिबिंब पडणं आवश्यक होतं. 'नगरी' भाषेची एक खास लकब आहे. ती लकब नेमकेपणाने पकडणारं डॉक्टरांचं 'राम राम पावनं' हे नगरी ठसक्याचं सदर आम्ही सुरु केलं होतं. डॉक्टर नगर जिल्ह्यातले असल्यामुळे त्यांना नगरची नस न् नस माहीत होती. चुरचुरीत शैली आणि वास्तवातली उदाहरणं यामुळे त्याचं हे सदर कमालीचं लोकप्रिय झालं होतं. विशेषतः त्यांनी शालजोडीतून ओढलेले कोरडे वाचकांची दाद मिळवत असत. या सदराच्या संयोजनाची जबाबदारी माझ्याकडे होती. मुळातच शिस्तबद्ध असलेल्या डॉक्टरांनी सदराचं वेळापत्रक कधी चुकवलं नाही. काही वेळा लेख थोडा मोठा व्हायचा. त्यांना फोन केला की ते म्हणायचे, 'तूच तो थोडा कमी करुन घे'. एकदा तर कहरच झाला. लेखातल्या दोन परिच्छेदामधला मजकूर थोडा बदलायला हवा होता.



डॉक्टरांना फोन करुन मी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणली. डॉक्टर गडबडीत होते. सहजपणे मला म्हणाले, ''हे बघ, मी गडबडीत आहे. तूच तुला हवा तो बदल करुन घे. तू तो बेमालूम करशील''.

वेगळ्या विचारसरणीच्या माणसावर डॉक्टरांनी टाकलेला हा विश्वास त्यांच्या मनाच्या दिलदारपणाचं प्रतीक होतं. डॉक्टरांशी अनेकवेळा गप्पा झाल्या. त्यांच्या सदाशिव पेठेतल्या कार्यालयातही दोन-तीन वेळा जाणं झालं. चर्चा होत असे पण संबंधात कधी कटुता आली नाही. गांधीजींचं तत्त्वज्ञान अंगीकारणारा, इतरांसाठी सदैव झगडणारा, परिस्थितीचं अचूक निदान करणारा, शंकरराव कोल्हे ते माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्याशी मैत्री असलेला, चंद्रशेखरांच्या भारत जोडो यात्रेत सहभागी झालेला हा माणूस सत्तेच्या मोहात कधी अडकला नाही. भ्रष्टाचाराचे इमले त्याने कधी उभारले नाहीत. आपली विचारसरणी त्याने अखेरपर्यंत निभावली. त्यांच्या बरोबरच्या संबंधांचा आलेख काढायचा असेल तर तो 'राग - चीड - मैत्री आणि विश्वास' या चार शब्दांनी काढता येईल. त्याच्या स्मृतिस प्रणाम. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो ही ते मानत नसलेल्या परमेश्वरचरणी प्रार्थना! ■■

---

◀◀ पान ४ वरून

# नव्याण्णव नांदी, नंतर शंभरावा आनंदी...!

प्रत्येक कार्यक्रमस्थळी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत महाराज. याचा लाभ लाखो वाचकांना होईल बघा. लोकांपर्यंत पुस्तके पोहोचविण्याचा हा अनोखा उत्सवच असेल महाराज!

**प्रधानजी :** यात आपल्या काही मराठी प्रकाशकांनाही घ्या. त्यांच्या बऱ्याच तक्रारी असतात नंतर. छपाई साहित्यावरील जीएसटी नाममात्र ठेवावे असा ठरावही घ्या यंदा संमेलनात. प्रकाशक सारे त्रस्त झालेत हो म्हणे!

**कार्याध्यक्ष :** त्या दृष्टीने आमच्या हालचाली सुरूसुद्धा झाल्यात. ठरावाचे मसुदे नोव्हेंबरअखेर अंतिम स्वरूपात येतील असं दिसतंय. सध्या फक्त पूर्वतयारीवरच भर. १५ ऑगष्ट जवळ येतोय ना...!

**महाराज :** पण कार्यक्रम पत्रिका वगैरे?

**सचिव :** स्थानिक शाखांच्या सचिवांनी व अध्यक्षांनी मुख्य शाखेला कळवल्यानंतर मुख्य शाखेने मंजुरी दिल्यावर संमेलनाचे कार्यक्रम पत्रिका जाहीर केली जाईल. नाशिक व निफाडचे संमेलन १ नोव्हेंबरला, तर मालेगावचे संमेलन २ नोव्हेंबरला आयोजित करण्यात आले आहे. नासिकला बैठक झाल्यामुळे या बैठकीत नियोजन समितीत त्या त्या विभागानुसार चार जणांचा गट करण्यात आला आहे. त्यानुसार स्थानिकांना अधिकाधिक समाविष्ट करून घेतले जाणार आहे.

नांदी संमेलनात विशेषतः तरुण, नवोदितांना संधी दिली



जाणार असून, संमेलनाचे व्यासपीठ सर्वांसाठी खुले असणार आहे.

**प्रधानजी :** अरे व्वा! छानच! पण नवोदितांसाठी काही प्रोत्साहनपर पारितोषिके वगैरे ठेवा ब्वॉ! नाही तर रिकाम्या खुर्च्या अन् साहित्यिकांनी फिरवावी पाठ?

**कोषाध्यक्ष :** अजिबात नाही होणार तसं यावेळी, तो कटू इतिहास समजावा. नांदी संमेलनात उत्कृष्ट काम केलेल्या नवोदितांना मुख्य संमेलनात संधी उपलब्ध करून दिली जाईल.

**सेवक :** पण नवोदितांपर्यंत परिषद पोहोचणार कधी?

**कार्याध्यक्ष :** लवकरच! आम्ही सर्वांना आवतनच देणार आहोत तसं!

**सेवक :** एक इनंती करू का? आमच्यासारख्यांनाही मसापचं सभासद व्हावसं लयी वाटतं हो पण तुमची वर्गणी का काय म्हणतात ती लयीच जास्त हाय आणि सभासद संख्येची अटही अट्टाहासच. ते तेवढं बघा ब्वॉ! शक्य झाल्यास वार्षिक का आजीव काय म्हणतात ती सभासद नोंदणी फी कमी करा.

**कार्याध्यक्ष :** नक्कीच! आणि आमचा एका शहरातील शाखेस अन्य जवळच्या पन्नासेक गावातील सभासद जोडून घेण्याचाही मानस आहे. बघूया काय होत ते.

**महाराज -** आणखी काही अडचणी वगैरे?

**कोषाध्यक्ष** (उत्साहाने) **:** आता फक्त मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत विविध बृहन्महाराष्ट्र मंडळाची संयुक्त बैठक व्हावी अशी इच्छा आहे.

**महाराज :** करतो आम्ही ते. बोलतो त्यांच्याशी आजच!

**सचिव :** खूप खूप आभार महाराज!

(महाराजांचा फोन वाजतो. ते अंदाज बांधत म्हणतात.)

**महाराज :** राणीसरकारांचा फोन आहे वाटतं! प्रधानजी आता आवरत घ्यायला हवं. उपवास सोडायची वेळ झाली वाटतं?

(आलेले कार्यकारिणी सदस्य उठू लागतात.)

**महाराज :** अहो थांबा जरा! एक शेवटची सुचना तर ऐका!

**कार्याध्यक्ष व कोषाध्यक्ष :** जी महाराज! जय हो! विजय हो! सांगा की, आपला हूकूम शिरसावंद्य!

**महाराज :** अलीकडे साहित्यिक वगैरे असणाऱ्यांपेक्षा साहित्यिक म्हणून दिसण्याचे, मिरवण्याचे दिवस आलेत मराठी साहित्यात. त्यामुळे अशा मंडळीला जरा चार हात दूरच ठेवा. अशा मंडळीसाठी साहित्य सोहळे म्हणजे खुर्चीचे डोहाळे. तेव्हा जरा बारीक लक्ष ठेवा या साहित्यबाह्य अभ्यागतांवर!

आणि हो, संमेलन हा केवळ एक कार्यक्रम न राहता मराठी भाषेच्या शंभर वर्षांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक प्रवासाचा महाउत्सव ठरला पाहिजे यासाठी प्रयत्न करा! सामान्य मराठी माणूस आणि आम्ही सदैव तुमच्या सोबत असू!

**कार्याध्यक्ष :** होय महाराज! नक्कीच. येऊ आता आम्ही...?

**महाराज :** थांबा क्षणभर, सेवका या सर्वांना मसाला पान दे आता! पुढील आढावा बैठक नोव्हेंबर अखेरीस घेऊ आपण. (सेवक पानपुड्यातून सर्वांना हसत हसत मसाला देतो.)

**(पडदा पडतो.)**

# धार्मिक द्वेष



**मयूर बागुल**
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

**लघुकथा**

गावाचं नाव होतं शांतिनगर. नावाप्रमाणेच गावात पूर्वी खरोखर शांतता होती. सकाळी मंदिरातील घंटानाद आणि त्याचवेळी मशिदीतून येणारा अजानचा स्वर एकमेकांत मिसळून एक सुंदर सुरावट तयार करत असे. गावातल्या लोकांना त्यात कधी विरोधाभास वाटला नव्हता; उलट ती त्यांच्या रोजच्या जगण्याची लय होती. रमेश आणि सलीम हे त्या गावातील अगदी जिवाभावाचे मित्र. लहानपणापासून ते एकत्र वाढले, एकत्र शाळेत गेले, एकत्र नदीत पोहले आणि एकमेकांच्या सणांमध्ये आनंदाने सहभागी झाले.

रमेश दिवाळीत सलीमला फराळ द्यायचा तर सलीम रमेशला ईदच्या शिरखुर्म्याचा पहिला घास स्वतःच्या हाताने भरवायचा. गावातल्या लोकांना त्यांच्या मैत्रीचं उदाहरण दिलं जायचं. पण काळ बदलत होता. एके दिवशी गावात काही बाहेरचे लोक आले. त्यांनी सभांचा, भाषणांचा कार्यक्रम सुरू केला. सुरुवातीला गावकऱ्यांना ते नवीन वाटलं, रोचक वाटलं. पण हळूहळू त्यांच्या शब्दांत विष उतरू लागलं. त्यांनी सांगायला सुरुवात केली की आपण वेगळे आहोत, आपली ओळख धोक्यात आहे. त्यांच्यामुळे आपल्यावर संकट येईल. गावात आधी कधी न ऐकलेले शब्द आता कानावर पडू लागले संशय, भीती, राग. रमेशच्या वडिलांनी एके दिवशी त्याला सांगितलं, सलीमपासून थोडं लांब राहा. काळ बदललाय. रमेशला हे ऐकून धक्का बसला. त्याने विचारलं, का बाबा? तो तर माझा भाऊ आहे. वडील शांत राहिले. त्यांच्या डोळ्यांत भीती होती. सलीमच्या घरीही तसंच वातावरण होतं. त्याच्या काकांनी त्याला बजावलं, आता विश्वास ठेवण्याचा काळ नाही. दोघंही गोंधळले होते. पण गावात हळूहळू भिंती उभ्या राहू लागल्या आधी मनात, मग प्रत्यक्षात. सण साजरे होणं बंद झालं.

एकमेकांच्या घरी जाणं थांबलं. बाजारातही लोक आता गटागटाने उभे राहू लागले. एक दिवस असा आला, जेव्हा गावात अफवा पसरली कुणीतरी मंदिराजवळ अपमानास्पद कृत्य केलं. कोणी पाहिलं नव्हतं, पण ऐकणाऱ्यांची संख्या वाढत गेली. आणि अफवा रागात बदलली. रात्री गावात दगडफेक झाली. दुसऱ्या दिवशी मशिदीच्या भिंतीवर काळे डाग दिसले. लोकांच्या चेहऱ्यांवर संशयाचा रंग चढला. रमेश आणि सलीम अनेक दिवस भेटले नव्हते. दोघांनाही भेटायचं होतं पण भीतीने पाय जड झाले होते. अखेर एके संध्याकाळी नदीकाठी ते अचानक समोरासमोर आले. क्षणभर दोघंही काही बोलले नाहीत. सलीम म्हणाला, ''आपण खरंच वेगळे आहोत का?'' रमेशने खाली पाहत उत्तर दिलं, ''मला माहीत नाही पण लोक म्हणतात तसं वाटायला लागलंय.'' त्यांच्या आवाजात वेदना होती. तेवढ्यात गावात अचानक आग लागल्याची बातमी आली. जुना वाडा पेटला होता आणि त्या वाड्यात राहत होते. वृद्ध दत्ताभाऊ आणि त्यांची पत्नी, ज्यांना दोन्ही समाज समान आदर देत असे. लोक धावत आले, पण कोणीही पुढे जाण्याची हिंमत करत नव्हतं. कारण वाडा त्या भागात होता जिथे दुसऱ्या धर्माचे लोक अधिक राहत होते. क्षणभर सगळे थबकले. तेव्हा रमेश आणि सलीम एकमेकांकडे पाहिले. काहीही न बोलता ते दोघं धावले. आगीत शिरताना त्यांना फक्त एकच गोष्ट आठवत होती आत अडकलेले दोन जीव. लोक स्तब्ध होऊन पाहत राहिले.

थोड्या वेळाने ते दोघं बाहेर आले खोकत, जखमी पण दत्ताभाऊ आणि त्यांच्या पत्नीला घेऊन. त्या क्षणी गावात एक विचित्र शांतता पसरली. आग अजून पेटत होती पण लोकांच्या मनात काहीतरी वितळायला लागलं होतं. दत्ताभाऊंच्या पत्नीने शुद्धीवर येत दोघांचे हात धरले आणि म्हणाल्या, ''धर्म वेगळे असतील पण जीव वाचवणारे देवासारखेच असतात.'' त्या एका वाक्याने वातावरण बदललं. लोकांनी पहिल्यांदाच स्वतःकडे पाहिलं. ज्यांनी कालपर्यंत भिंती उभ्या केल्या होत्या, त्यांनी आज त्या भिंतींची राख पाहिली. हळूहळू लोक एकत्र येऊ लागले आग विझवण्यासाठी. कोणाच्या हातात पाणी होतं, कोणाच्या हातात चादर पण आता कुणी विचारत नव्हतं की कोण कोणत्या धर्माचा आहे. रात्रभर सगळ्यांनी मिळून आग विझवली. सकाळी वाडा जळून राख झाला होता, पण गावाच्या मनात एक नवीन दिवा पेटला होता. काही दिवसांनी मंदिराची घंटा आणि अजान पुन्हा एकत्र ऐकू येऊ लागले. रमेश आणि सलीम पुन्हा एकत्र बसले होते नदीकाठी.

रमेश म्हणाला, ''आपण जवळजवळ सगळं गमावलं होतं.'' सलीम हसला पण शेवटी आपण स्वतःला सापडलो. गावाने एक मोठा धडा शिकला होता. धार्मिक द्वेष बाहेरून येतो पण त्याला आश्रय आपणच देतो आणि जेव्हा माणूस माणसासाठी उभा राहतो तेव्हा कोणताही द्वेष टिकत नाही. शांतिनगर पुन्हा शांत झालं. पण यावेळी ती शांतता फक्त नावापुरती नव्हती ती अनुभवातून जन्मलेली होती. राखेतून उठलेल्या त्या दिव्याने गावाला कायमचा प्रकाश दिला.




# दरोज मीच झाडती!

शालेय स्वच्छता करायला मुलांना नेहमीच आवडते. त्यात काही आवर्जून आपले ठरलेले काम पुढाकार घेऊन करतात तर काहींना सवय व्हावी म्हणून नियोजनाप्रमाणे त्यांच्याकडून करवून घेतले जाते.

असेच एके दिवशी वर्ग झाडण्यासाठी समोर असलेल्या मुलीला सहज हटकले तर तिने या आठवड्यात केलेल्या कामाची पावतीच भराभर समोर ठेवली. तिचे मनोमन पटलेही होते पण आता पुन्हा तिलाच करावे लागणार म्हणून तिला समजावू लागलो आणि झाडू हातात घेत मीच वर्ग झाडू लागलो. तिला कसेकसे झाले. तिने हातातून झाडू घेत, ''सर, दरोज मीच झाडती ना! त्या कोणीच लवकर येती नहीं.''

चौथीतील त्या मुलीने थोड्याशा नाराजीने हे वाक्य



**भरत विठ्ठल पाटील**
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

**मज आवडते मनापासूनी शाळा**

म्हटले आणि हातातला झाडूने वर्ग स्वच्छ करू लागली. वाकून काम करत असलेल्या चेहऱ्यावरचा राग, नाराजी आणि मनातील प्रश्न स्पष्ट दिसत होता. वर्गातील इतर मुले तिच्याकडे पाहत होती. काहींच्या चेहऱ्यावर हसू होते तर काहींना तिचे म्हणणे योग्यही वाटत होते.

मी तिच्याजवळ गेलो आणि शांतपणे विचारले, ''खरंच दररोज तूच झाडतेस का?''

ती म्हणाली, ''नाही सर... पण माझीच नेहमी पाळी येते असं वाटतं. तुम्ही वाटे पाडले आहेत ना! बाकीच्या मुली लवकर येतीच नही.''

मी हसत म्हणालो, ''अगं बाई, दररोज काम केल्याने कुठे काही बिघडते का? उलट चांगली सवय लागते. वर्ग आपलाच आहे ना? जसं घर आपलं असतं, तसंच शाळाही आपलीच असते.''

तिथे असलेल्या मुलांचे लक्ष आता आमच्या संवादाकडे लागले होते. ती ऐकत होती याची जाणीव झाली होती.

मी पुढे म्हणालो, ''महात्मा गांधींनी बुनियादी शिक्षण सांगताना श्रमाला शिक्षणाइतकंच महत्त्व दिलं होतं. स्वतः काम करणं, परिसर स्वच्छ ठेवणं आणि श्रमाची प्रतिष्ठा जपणं हा त्यांच्या शिक्षणाचा पाया होता. साने गुरुजीही स्वतःची कामे स्वतः करत असत. त्यांनी कधीही श्रमाला कमीपणा मानला नाही.''

तिने काम थांबवले. ती आता शांतपणे ऐकत होती. मुलेही जवळ आली.

मी तिला विचारले, ''तू घरी तुझं ताट स्वतः जागेवर ठेवतेस ना?''

''हो सर.''

''दप्तर स्वतः भरतेस?''

''हो.''

''मग वर्ग आपला आहे, त्याची स्वच्छता ठेवणं हीदेखील आपलीच जबाबदारी नाही का?''

तिच्या चेहऱ्यावर हलकेसे स्मित उमटले. ती हसली. बाजूला असलेला एक मुलगा बोलला, ''सर, मग आपण रोज सगळे मिळून दोन मिनिटे वर्ग स्वच्छ केला तर कोणालाच काही वाटणार नाही. समदे काम करतील नि स्वच्छताही लवकर होईल.''

''क्या बात है!'' मी आनंदाने म्हणालो. त्यांना समजावत, ''पोरांनो, स्वच्छता ही शिक्षा नसते, ती सगळ्यांची जबाबदारी असते.''

त्या दिवसापासून वर्गात एक छोटासा नियम झाला. घंटा वाजण्यापूर्वी दोन मिनिटे सर्व विद्यार्थी आपापली जागा स्वच्छ करायचे. कुणी कागद उचलायचा, कुणी बाक नीट लावायचा, कुणी फळा पुसायचा तर कुणी खिडक्या बंद करायचा. आता झाडू हातात घेताना कुणालाही कमीपणा वाटत नव्हता. कोणी ठरल्याप्रमाणे कामे करत असताना दिसत होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. केवळ पुस्तकातील ज्ञान नव्हे तर जीवनासाठी आवश्यक कौशल्ये, जबाबदारीची जाणीव, सहकार्य, नेतृत्व, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा विकास शाळेतूनच व्हावा अशी त्यामागील भूमिका आहे. वर्ग स्वच्छ ठेवणे ही छोटी कृती वाटली तरी त्यातून जबाबदारी, वेळेचे नियोजन, संघभावना आणि स्वअनुशासन यासारखी जीवनकौशल्ये सहज विकसित होतात.

राज्य शासनानेही शालेय स्वच्छतेला विशेष महत्त्व दिले आहे. स्वच्छ वर्ग, स्वच्छ शौचालये, सुरक्षित पिण्याचे पाणी, हात धुण्याच्या सवयी, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि स्वच्छ परिसर या गोष्टी विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट जोडलेल्या आहेत. शाळेतील स्वच्छता ही विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाज या सर्वांचा सहभाग असलेली सामूहिक चळवळ आहे. काही दिवसांनी स्वच्छतेविषयी नाराजी व्यक्त करणारी ती मुलगी स्वतःच म्हणाली, ''सर, आज माझी पाळी आहे. मी झाडते.''

मी तिच्याकडे पाहिले. काही दिवसांपूर्वी नाराजीने झाडू हातात घेणारी मुलगी आज आनंदाने काम करत होती. तिच्या चेहऱ्यावर समाधान होते. वर्गातील इतर मुलेही उत्साहाने तिच्या मदतीला धावली होती. सोबतीने सारे मुले काम करत होती. शिक्षण म्हणजे केवळ धडा शिकवणे नाही; तर विचार बदलणे, सवयी घडवणे आणि मूल्यांची बीजे पेरणे होय. एका छोट्याशा संवादातून स्वच्छतेचा संस्कार रुजला आणि श्रमाची प्रतिष्ठा मुलांच्या मनात नकळत निर्माण झाली. स्वच्छ वर्ग म्हणजे फक्त स्वच्छ भिंती नव्हेत; तर स्वच्छ विचार, सामूहिक जबाबदारी आणि सुंदर भविष्याची सुरुवात असते.



# अस्तित्त्वाचे काय करायचे?



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०



ओशोंच्या कथा

**मानवी जीवनाचा प्रवास नेमका कशासाठी आणि कसा व्हायला हवा? हा विचार अनेकदा मनात येतो. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी असेल तर जीवन अधिक आनंदाने जगता येते. जीवनाचा अर्थ शोधता येतो पण जीवनाचा प्रवास केवळ एक घटना आहे म्हणून त्याकडे पाहत राहिले तर निराशा आहे. आनंदाचे क्षण आहेत, प्रत्येक वळण आपणाला काही तरी शिकवणारे आहे मात्र त्या प्रत्येक वळणाकडे पाहण्याची दृष्टी आपल्याकडे असायला हवी. जीवनात अर्थाचा शोध लागत जातो. जीवन आणि नदी याचे नाते जवळचे आहेत. नदी ज्याप्रमाणे वाहत जाते त्याप्रमाणे जीवन देखील प्रवाहीत असते. नदी वाहत जाते तेव्हा ती अनेक गोष्टी आपल्याला सांगत जाते. नको असलेल्या गोष्टी बाजूला सारत जाते. ती आपल्याला या साऱ्या प्रवासातून जीवनाला अर्थ प्राप्त करून त्यांच्या दृष्टीने काही शिकवत असते.**

आता आपल्याला शिकायचे असेल तर प्रत्येक गोष्टीतून शिकता येते मात्र त्यासाठीची विचारदृष्टी असायला हवी असते. ती नसेल तर फक्त नदीचे पाणी वाहते आहे, असेच आपल्याला वाटून जाते. ओशो मात्र या संदर्भात अत्यंत सुंदरतेने नदीचे वाहणे आणि माणसांचे जगणे या संदर्भात विवेचन करतात. ते समजावून घेतले तर आपल्यालाही जगण्याचा अर्थ शोधणे सहज आणि सुलभ होत जाणार आहे.

ओशोनी सांगितलेली गोष्ट आपल्याला बरेच काही सांगणारी आहे. ''जीवन म्हणजे नदी आहे. ती सतत वाहते असते. कधीच थांबत नाही. खरं तर थांबते ती नदी कशी? जी कधीच थांबत नाही ती खरी नदी. पाणी आहे पण वाहत नाही, फक्त साचलेले आहे. त्याला डबके म्हणतात. ते पाणी साचलेले राहिल्याने त्याला एक प्रकारची दुर्गंधी येते. त्याचबरोबर हळूहळू त्या पाण्यामध्ये परिसरातील सजिवांना धोका देणारे कीटक तयार होतात. त्यातून अवतीभोवतीचा सारा परिसर धोकादायक बनतो. जीवनाचे देखील असेच आहे. जीवन जर प्रवाहित ठेवले नाही तर जीवनाचे देखील डबके होते. नदी जेव्हा वाहत जाते तेव्हा तिचा शेवट समुद्रामध्ये होत असतो. तसेच मनुष्याच्या जीवनामध्ये सातत्याने नवनवीन विचारांचा शोध असतो. तत्त्वांचा बोध असतो. कर्माची वाट असते. कर्तव्याची जाणीव असते. या साऱ्या प्रवासात तो नव्याचा शोध घेत असतो. जीवनाच्या एका टप्प्यावर माणसाला सत्याचा शोध लागतो. सत्याच्या शोधाच्या वाटेचा प्रवास माणसाला परमात्म्याच्या दिशेने घेऊन जातो. माणसाला परमात्मा भेटला की जीवनात दुसरे काय हवे असते? तो एका अर्थाने जीवनाचा अंतिम शोध असतो. माणूस सतत शोध घेत राहतो आणि शेवटी सत्यात, परमात्म्यात विलीन होतो. ''नदीचा प्रवास, नदीचा जन्म पर्वतांमध्ये होतो. सुरुवातीला ती लहानशी धार असते. ती खडकांमधून मार्ग काढते, अडथळे पार करते. कधी ती वेगवान असते, कधी शांत. ती गावांमधून, शहरांमधून, जंगलांमधून वाहते. नदीचा प्रवास म्हणजे मनुष्याचे जीवन आहे. बालपण म्हणजे पर्वतातील धार, तरुणपण म्हणजे वेगवान प्रवाह आणि वृद्धत्व म्हणजे शांत वाहणारी नदी. माणसाच्या जीवनाचे टप्पे देखील यासारखेच असतात. नदीचा उगम, मध्यावरील प्रवाह आणि अंतिम समुद्राला मिळणे हे जसे तिच्या वाटेला येते तसे माणसाच्या आयुष्याला देखील जन्म, जगणे आणि मृत्यू या तिन्ही गोष्टींना त्याला आयुष्यात सामोरे जावे लागत असते.

अडथळे आणि संघर्ष नदीला सतत पार करावे लागतात. कधी तिला खडकावरुन, कधी वाळू, वळणे अशा विविध स्वरूपात तिला संघर्ष करत प्रवाहित राहावे लागते पण ती थांबत नाही. ती अडथळ्यांना स्वीकारते, त्यांना पार करते. कधी ती वळसा घेते, कधी ती खडक फोडते. माणसाच्या आयुष्यात देखील त्याला या स्वरूपातच संघर्ष करत जगावे लागते. आज संघर्ष पार करायची हिम्मत नदीसारखी सतत मनगट ठेवावी लागते, त्यासोबत मस्तकातही असावी लागते. जीवनात अडथळे येतात पण जो थांबत नाही, तोच शेवटी समुद्राला पोहोचतो.

नदी प्रवासात अनेकांना जीवन देते. शेतांना पाणी देते. गावांना पिण्याचे पाणी देते. माणसांना, प्राण्यांना, झाडांना जगवते. आपण जेव्हा जीवनाचा प्रवास करत असतो तेव्हा केवळ स्वतःसाठी जगायचे नसते. आपल्या आयुष्यामध्ये हा प्रवास करताना आपण कोणाच्या कामी आलो आहोत? कोणाला मदत करतो आहोत? कोणासाठी मदतीचा हात दिला आहे?आपल्यामुळे इतर कोणाला त्रास होत नाही ना? अशा अनेक गोष्टींचा विचार सातत्याने करण्याची गरज असते. नदी जसे फक्त देत जाते आणि इतरांच्या आयुष्याला बहर आणत जाते, नदीचे पाणी सर्वांनाच जगण्यासाठी शक्ती देत असते. त्याप्रमाणे माणसाचे आयुष्य देखील इतरांच्या आयुष्याला बहरवणे, फुलवणे यासाठी उपयोगी पडण्याची गरज असते. तो इतरांसाठीही किती जगतो याला अधिक महत्त्व आहे. जो इतरांसाठी जगतो त्याच्याच आयुष्याचे जीवन बनते. अन्यथा जगणे तर सुरूच असते. माणसे जगतात ते का? तर फक्त मृत्यू येत नाही म्हणून! पण जेव्हा तुम्ही इतरांच्या मदतीला जाता, इतरांच्या कामी येता तेव्हा तुमच्या आयुष्याचे, जगण्याचे जीवन घडत असते. ते तुम्हाला जीवनाच्या प्रवासाची दिशा दाखवत असतात. माणूस जेव्हा या दिशेचा प्रवास करू लागतो तेव्हा त्याचे जगणे हे समृद्धपणाचा प्रवास ठरतो. एका अर्थाने त्याचे जगणे म्हणजे समर्पण असते. ही समर्पणाची वृती त्याच्यातला 'मी'पणा संपवते. अहंकाराचा लोप होतो आणि मग अशी माणसं देवरूप होऊन जातात. जसं संत म्हणाले होते, 'देव पाहावयला गेलो। देव होऊनिया ठेलो' त्याप्रमाणे माणसाचे जीवन व्हायला हवे. नदीचा समुद्र होऊन आणि माणसाचा देव होणे या दोन्ही गोष्टी आयुष्याच्या अंतिम साध्यतेच्या आहेत हे आपण लक्षात घ्यायला हवे. ओशो म्हणतात : मनुष्याचा प्रवासही असा आहे. शेवटी तो परमात्म्यात विलीन होतो. त्याचे स्वतंत्र अस्तित्व संपते पण तो अनंताचा भाग बनतो. माणूस जीवनात सातत्याने नवा शोध घेत असतो. तो अनुभव, ज्ञान, संघर्षातून प्रवास करत असतो. शेवटी तो सत्यात विलीन होतो. जीवनाचा शेवट म्हणजे मृत्यू नाही तर परमात्म्यातील विलीनता आहे. वर्तमानामध्ये आपण जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करायला हवा. आज आपल्याला जीवनाचा अर्थ शोधण्यासाठी पैसा हवा आहे. संपत्ती हवी आहे. सत्ता हवी आहे. किंबहुना आपल्याला उपभोगवादी विचाराची प्रक्रिया म्हणजे जीवन असे वाटू लागले आहे. त्यामुळे जीवनाचा अर्थ हरवला जातो आहे. जीवनाचा शोध लागत नाही. जीवनामध्ये सर्व प्रकारचे भौतिक सुख मिळत जाते, तेव्हा शेवटी लक्षात येतं की भौतिक सुखाची उधळण म्हणजे जीवन नाही. आयुष्य आजवरच्या प्रवासात आपण व्यतीत केले पण त्यातून जीवनाचा अर्थ शोधता आला नाही. त्यामुळे जेव्हा जीवनाचा अर्थ कळतो आणि हाती काही लागत नाही तेव्हाच जीवन वाया गेले असेच म्हणावे लागेल. आपण सतत धावपळीत असतो. करिअर, पैसा, यश! पण शेवटी हे सर्व समुद्रात विलीन होणाऱ्या नदीसारखे आहे.

जीवन सतत वाहत असते. थांबणे म्हणजे मृत्यू. अडथळे स्वीकारा, संघर्ष करा हा प्रवासाचा भाग आहे. नदी इतरांना जीवन देते तसेच आपणही इतरांना मदत करावी. विलीनता स्वीकारावी. शेवटी आपण परमात्म्यात विलीन होणे हे जीवनाचे अंतिम ध्येय आहे. आत्म्याचा प्रवास ओळखून आपला प्रवास सुरू ठेवायला हवा. बाह्य यशापेक्षा अंतर्गत शांतता महत्त्वाची आहे. 'नदी आणि समुद्र' ही कथा आपल्याला सांगते की जीवन म्हणजे सतत वाहणारा प्रवास आहे. अडथळे असूनही आपण पुढे जायचे आहे. इतरांना जीवन देत राहायचे आहे. शेवटी आपण सत्यात, परमात्म्यात विलीन व्हायचे आहे. नदी समुद्रात विलीन झाली की ती नदी राहात नाही, ती समुद्र बनते. तसेच आत्मा परमात्म्यात विलीन झाला की तो स्वतंत्र राहात नाही, तो अनंताचा भाग बनतो. आपल्या आयुष्यामध्ये आपण अनंताचा भाग बनने याशिवाय दुसरे काय आहे? ईश्वररूप होणं हे जर जीवनाचे ध्येय बनले असेल तर त्या दिशेने आपण सातत्याने चालायला हवे. शेवटी त्यासाठी जीवनाला त्यागाच्या वाटेने प्रवास करावा लागेल. अहंकाराची वाट सोडून द्यावी लागेल. या वाटेच्या प्रवासाचा आपल्याला ईश्वर रूप दाखवेल. त्यामुळे आपण कोणत्या दिशेचा प्रवास करायचा हे ठरवायला हवे. नदीचे अस्तित्त्व हे नेहमी छोटे असते आणि समुद्राचे अस्तित्त्व हे सर्वाधिक मोठे असते. आपल्या अस्तित्त्वाचे काय करायचे? हे आपले आपण ठरवायला हवे इतकेच...

# अजून दोन पानं



मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
९८९०६१९३५४

रात्रीचा तो निवांत क्षण घरभर पसरलेली निरव शांतता, खिडकीतून अलगद शिरणारी वाऱ्याची झुळूक आणि भिंतीवर टांगलेल्या घड्याळाची संथ टिक-टिक. टेबलावरील दिव्याच्या मंद प्रकाशात आपण हळूच एक पुस्तक उघडतो. अक्षरांवर नजर स्थिरावते, पानं अलगद उलटतात आणि नकळत आपण त्या शब्दांच्या दुनियेत हरवून जातो. ''झोपायचं नाही का अजून?''

आईचा हलकासा आवाज कानावर येतो. आपण थोडंसं हसतो, बोटं पानावर ठेवत म्हणतो, ''थांब ना, अजून दोन पानं.'' त्या दोन पानांतच एक संपूर्ण आयुष्य दडलेलं असतं – 'भावनांचं, विचारांचं आणि स्वतःला शोधण्याचं.'

आज चित्र बदललं आहे. ''काय बघतोयस एवढं?'' कोणी विचारलं की सहज उत्तर येतं, ''काही नाही, बस स्क्रोल करतोय'' अंगठा वर सरकतो आणि त्याचबरोबर आयुष्यही जणू पुढे सरकत राहतं. एक पोस्ट, मग दुसरी, मग तिसरी क्षणाक्षणाला काहीतरी नवीन समोर येतं; पण मनात साठत मात्र काहीच नाही. ''अरे वा!'' असा क्षणिक आनंद, ''हे काय आहे?'' अशी उत्सुकता आणि पुढच्याच क्षणी सगळं विरून जातं. काहीच मनात ठसत नाही, काहीच खोलवर भिडत नाही. थांबणं हरवलंय, म्हणून कदाचित जाणवणंही हरवत चाललंय. पूर्वी पुस्तकं आपल्याला विचार करायला भाग पाडायची. ''हे पात्र असं का वागलं असेल?'' असा प्रश्न मनात रेंगाळत राहायचा आणि त्याच प्रश्नांतून विचारांची एक नवी दिशा उलगडायची. वाचन म्हणजे थांबणं होतं. जगापासून थोडं दूर जाऊन स्वतःजवळ येणं होतं. त्या शांततेत पुस्तकं ही एकांतातली सुंदर सोबत बनायची. कागदाचा मंद सुगंध, पानांचा कोमल स्पर्श आणि अक्षरांमधून उमटणारी भावना हे सगळं मनाच्या आत खोलवर साठून राहायचं. आज मोबाईलच्या स्क्रीनमध्ये गर्दी आहे – माहितीची, चित्रांची, आवाजांची. पण तरीही मन एकटंच वाटतं. ''ऑनलाइन आहेस, पण बोलत का नाहीस?'' हा प्रश्न आता नात्यांमध्येही ऐकू येतो आणि त्यात एक न बोललेली वेदना दडलेली असते. हे तंत्रज्ञान चुकीचं नाही. हा बदलही अटळ आहे. पण या बदलांच्या प्रवाहात आपण काहीतरी मौल्यवान मागे सोडत आहोत, हेही तितकंच खरं आहे. पुस्तकं आपल्याला घडवत होती. संयम, संवेदनशीलता आणि विचारांची खोली देत होती. आजचं स्क्रोलिंग आपल्याला फक्त व्यस्त ठेवतं, कधी नकळत थकवतंही. ''एखादं पुस्तक घेऊन बसायला वेळ कुठे आहे आता?'' आपण सहज म्हणतो. पण खरंच वेळ नाही की आपणच वेळ देणं विसरलो आहोत? पुन्हा सगळं जुनं परत येणार नाही, पण दिवसातले काही क्षण तरी स्वतःसाठी राखून ठेवू शकतो.

स्क्रीन बाजूला ठेवून एखादं पुस्तक हातात घेऊन त्या अक्षरांमध्ये हरवू शकतो. कदाचित पुन्हा एखाद्या निवांत रात्री तोच ओळखीचा आवाज कानावर येईल, ''काय वाचतोयस?'' आणि आपण पुन्हा हसत म्हणू, ''थांब ना, अजून दोन पानं'' त्या क्षणी स्क्रोल होणाऱ्या या वेगवान जगात वेळ पुन्हा एकदा थांबेल आणि हलकंसं सांगून जाईल की आयुष्य फक्त पुढे सरकण्यासाठी नसतं; तर कधीतरी थांबून, अनुभवून आणि मनात साठवून ठेवण्यासाठीही असतं.

प्रति,

८

सोमवार, दि. ३ ते ९ ऑगस्ट २०२६


साप्ताहिक चपराक www.chaprak.com

PRGI No. MAHMAR/2011/35979

'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा


संपर्क : ७०५७२९२०९२

# राजेंद्र सोमवंशी यांच्या कवितांचा अभ्यासक्रमात समावेश



**निफाड :** तालुक्याचे भूमिपुत्र, नाशिक जिल्ह्यातील सुप्रसिद्ध बालसाहित्यिक राजेंद्र सोमवंशी यांच्या 'वासुदेव गीत' व 'शाळेला छान छान बनवायचं...' या दोन कवितांचा समावेश महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाच्या इयत्ता चौथीच्या कलाशिक्षण पाठ्यपुस्तकात समाविष्ट केला आहे. महाराष्ट्रातील लोकपरंपरा जपणारी माणसं तसेच बरीच जुनी परंपरा व त्यांची वैशिष्ट्ये वासुदेव गीत या कवितेत मांडली आहेत. तर 'शाळेला छान छान बनवायचं' या कवितेतून स्वच्छतेचा संदेश व पाण्याची बचत करण्याची सवय या दोन महत्वाची गोष्टी मांडण्यात आल्या आहेत. यातून संस्कार जपणाऱ्या मूल्यशिक्षणाचा धडाही मिळतो.

२०२६-२७ च्या अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या या कविता अनेक वर्षे ज्ञानदानाचे कार्य करणार आहेत. बालसाहित्यिक राजेंद्र सोमवंशी यांचे 'गम्माडी गम्मत' व 'गीत नवे गाऊ' हे दोन



वासुदेव ही महाराष्ट्रातील एक अत्यंत प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. ही परंपरा प्रामुख्याने समाज प्रबोधन व भक्तीचा प्रसार करण्यासाठी ओळखली जाते.

वासुदेव गीत
वासुदेव आला
वासुदेव आला...

पहाट झाली स्वारी आली
अहो सूर्य देव हा जागा झाला....
वासुदेव आला वासुदेव आला.....

गळा घालून तुळशीची माळ,
हाती घेऊन चिपळ्या टाळ
म्हणे मुखाने हरिनाम बोला....
वासुदेव आला वासुदेव आला....

जगण्याचं देई भान
मागतो पसाभर दान
चला देऊ या दूधभात काला
वासुदेव आला वासुदेव आला...

गीत– राजेंद्र सोमवंशी


**वासुदेव गीतासाठी – चिपळ्या, टाळ, बासरी, पायातील घुंगरू इत्यादी वाद्ये वापरतात.**

- उपलब्ध साहित्याचा उपयोग करून वासुदेव गीत म्हणा.

- **वासुदेव गीताबद्दल माहिती सांगावी.**
- **लोकगीत प्रकारांवर चर्चा करावी.**
- **प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.**

CG-3/4
C- 3.1/4.2
LO-04AE48 / 52/53

६०





बालकाव्यसंग्रह प्रकाशित झाले असून 'गीत नवे गाऊ' हा बालकाव्यसंग्रह 'चपराक प्रकाशन'ने प्रसिद्ध केला आहे.

या संग्रहास तीन जिल्हा व तीन राज्य पुरस्कार मिळाले असून राजेंद्र सोमवंशी यांनी दिल्ली येथे संपन्न झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून उत्तर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे.

बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात कविता समाविष्ट झाल्याबद्दल आमदार दिलीपकाका बनकर, माजी आमदार अनिल कदम, सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, एन.ई.आय.चे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन, म्हाडाचे विभागीय अध्यक्ष रंजन ठाकरे, दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दत्तात्रेय पाटील, भाजप नेते बंडुकाका बच्छाव, माजी जि.प.सदस्य अमृता पवार, उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, अर्बन बँकेचे चेअरमन नंदलालजी चोरडिया, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र डोखळे, प्रकाश दायमा, माजी संचालक शिवाजीराव ढेपले, शिक्षक नेते संजय चव्हाण, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. प्रवीण ठाकरे, 'चपराक प्रकाशन'चे घनश्याम पाटील, ॲड. इंद्रभान रायते, साहित्य परिषद शाखा नाशिकरोडचे अध्यक्ष उन्मेष गायधनी, शिक्षक नेते रवींद्र मोरे, शिवाजीराव निरगुडे, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध बालसाहित्यिक डॉ. सुरेश सावंत, बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड, प्रा. प्रशांत मोरे, साहित्यिक विवेक उगलमुगले, सूत्रसंचालक रवींद्र मालुंजकर, गिरणा गौरवचे अध्यक्ष सुरेश पवार, सावानाचे कार्याध्यक्ष संजय करंजकर, माणुसकी फाऊंडेशनचे सागर निकाळे, युवा कवी प्रशांत केंदळे, बालसाहित्यिक किरण भावसार, कवी राजेंद्र उगले, कवी राज शेळके, कवी संदीप देशपांडे, प्रा.जावेद शेख, कवी राजेंद्र दिघे आदींनी अभिनंदन केले आहे.

'साहित्य चपराक'च्या ऑगस्टमधील मासिकाच्या वाचनीय लेखांची मांदियाळी







राजकारणमंचाच्या रसिकांसाठी




आप्पांचे पत्र : कृतियुक्त संपन्न अनुभव!

जीवनकौशल्य घडवण्याचे आव्हान

एक सुरेल प्रवास

पाऊस अन् प्रेम

साहित्य चपराक

भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०

वेबसाईट : www.chaprak.com. ईमेल : info@chaprak.com

लाडोबा प्रकाशनाची दर्जेदार पुस्तके आता तुमच्या घरी!

लाडोबा प्रकाशन




मराठी साहित्याचा अनमोल ठेवा, उत्कंठावर्धक कथा, प्रेरणादायी चरित्रे आणि वैचारिक साहित्याची मेजवानी घेऊन येत आहे लाडोबा प्रकाशन. प्रत्येक पान तुम्हाला एका नवीन विश्वात घेऊन जाईल.




आमच्या प्रकाशनाची वैशिष्ट्ये

वैविध्यपूर्ण साहित्य : कथा, कादंबरी, काव्यसंग्रह आणि बालसाहित्य.
उच्च दर्जाची छपाई : वाचताना डोळ्यांना सुखद अनुभव देणारी मांडणी.
कल्पकता आणि संस्कारांची जोड : चित्रांच्या दुनियेतून साहित्याचा प्रवास

ऑनलाइन खरेदीसाठी लिंक : Website : www.chaprak.com

तुमची आवडती पुस्तके आजच ऑर्डर करा!

मुलांनो दिसामाजी काहीतरी चांगले वाचा!, लाडोबाची पुस्तके घरपोच मागवा!

लाडोबा–बालकुमारांचे लाडके मासिक



दरमहा ज्ञानाची नवी शिदोरी आणि मनोरंजनाचा खजिना हवा असेल, तर आजच लाडोबा मासिकचे सभासद व्हा.

'लाडोबा' मध्ये काय आहे खास?

- रंगीत आणि आकर्षक चित्रे : ३ ते ५ वर्षांच्या चिमुकल्यांना चित्रांच्या माध्यमातून अक्षरांची ओळख करून देणारी रचना.
- संस्कारक्षम कथा : ६ ते १४ वर्षांच्या मुलांसाठी बोधकथा, परीकथा, आणि साहसी कथा, ज्यातून नकळत चांगले संस्कार घडतील.
- बुद्धीला चालना : मेंदूला खुराक देणारी शब्दकोडी, चित्रकोडी, आणि गणिताच्या गमतीजमती.
- कला आणि कार्यानुभव : चित्रकला, ओरिगामी आणि टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवण्याचे धडे.
- ज्ञानाचे भांडार : सामान्य ज्ञान (GK), विज्ञानातील गमती आणि निसर्गाची माहिती.



www.chaprak.com

संपर्क : ७०५७२९२०९२